पुढारी MY कोल्हापूर बुधवार १७ जुलै २०२४

# ‘विवेकानंद’मध्ये नवनियुक्त शिक्षकांचे उद्‌बोधन

**कोल्हापूर :** येथील विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी नवनियुक्त शिक्षकांचे उद्‌बोधन घेण्यात आले. शाळा सिद्धीप्रमुख प्रा. गीतांजली साळुंखे यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जीवन कार्यावर व्याख्यान दिले. ज्युनिअर सायन्स विभागप्रमुख प्रा. एम. ए. कुरणे यांनी प्रास्ताविक केले. स्टाफ सेक्रेटरी के. जे. गुजर यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

तरुण भारत संवाद
बुधवार, १७ जुलै २०२४

# विवेकानंदमध्ये नॅकसंदर्भात कार्यशाळा

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये आयक्युएसी आणि इंग्रजी विभागाच्या संयुक्त विद्यमाने प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी 'नॅकला सामोरे जाताना' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी गणित विभागप्रमुख प्रा. एस. पी. थोरात होते. शिवाजी विद्यापीठातील सॉफ्ट स्कील ट्रेनर डॉ. वैशाली शिंदे यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे मार्गदर्शन केले. 'संवाद कौशल्ये व शिष्टाचार' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. डॉ. श्रृती जोशी यांनी प्रास्ताविकात महाविद्यालय नॅक च्या चौथ्या सायकलला सामोरे जात असून पिअर टीम प्रत्यक्ष भेटीवेळी करावी लागणारी तयारी यांसाठी या कार्यशाळेचे आयोजन केल्याचे सांगितले. इंग्रजी विभागप्रमुख डॉ. कविता तिवडे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. सूत्रसंचालन प्रा सुप्रिया पाटील यानी केले. महाविद्यालयाचे कुलसचिव आर. बी. जोग यांनी आभार मानले. यावेळी सहाय्यक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे, अधीक्षक एस. के. धनवडे, प्रा. माधुरी पवार, प्रा. कोमल व्होनखंडे आदी उपस्थित होते.

18/07/2024

18.07.2024